# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः22.02.2026** **वारःरविवार**

---

- देशातून नक्षलवादाला 31 मार्चपर्यंत हद्दपार करण्याचा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा पुनरुच्चार.

- इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ मध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित घोषणापत्राचा स्वीकार.

- पंतप्रधान नरेंद्र मोदी आज करणार आकाशवाणीवरून करणार मन की बात.

- उसाच्या रास्त आणि किफायतशीर किमतीवर साखर कारखान्यांना 15 टक्के व्याज द्यावे लागणार.

आणि

- महिला क्रिकेटमध्ये भारताचा ऑस्ट्रेलियावर मालिका विजय तर पुरुष संघाचा आज दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सामना.

**<u>नक्षलवाद</u>**

केंद्रीय राखीव पोलीस दलाने देशासाठी अतुलनीय सेवा केली असून सीआरपीएफ जवान आणि कोब्रा बटालियन देशाला नक्षलमुक्त करण्यात अभूतपूर्व काम करत असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. गुवाहाटी येथे ८७ व्या सी आर पी एफ च्या स्थापना दिनाच्या संचलन कार्यक्रमात ते काल बोलत होते. ईशान्य प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि माओवादग्रस्त भागात शांतता स्थापित करण्यात सीआरपीएफने महत्त्वाची भूमिका बजावली असून सीआरपीएफशिवाय देश आपल्या अंतर्गत सुरक्षेची कल्पनाही करू शकत नाही असंही शहा यावेळी

म्हणाले. शहा यांच्या हस्ते सीआरपीएफ जवानांना शौर्य पदके देवून त्यांचा सन्मान केला. राष्ट्राचे रक्षण करताना प्राण गमावलेल्या सीआरपीएफ जवानांना त्यांनी श्रद्धांजली वाहिली. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा शर्मा हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<u>इंट्रो-एआयसमिट</u>**

नवी दिल्लीमधील इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ मध्ये एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित घोषणापत्र स्वीकारण्यात आले. कृत्रिम बुद्धिमत्तेवरील जागतिक सहकार्यातील हा एक महत्त्वाचा टप्पा असून एकंदर ८८ देश आणि आंतरराष्ट्रीय संघटनांनी याला मान्यता दिली आहे. आर्थिक विकास आणि सामाजिक कल्याणासाठी एआयचा वापर करण्याबाबतच्या व्यापक जागतिक सहमतीचे प्रतिबिंब या घोषणेमध्ये आहे. परिषदेत तंत्रज्ञानातल्या वेगवेगळ्या अडचणींवरचे उपाय मांडण्यात आल्याचं केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. याबाबत अधिक माहिती देताना वैष्णव म्हणाले........

इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ च्या तीन स्तंभांना पाठिंबा देत, सतत सहकार्य करण्याची वचनबद्धता देखील व्यक्त करण्यात आली.

**<u>मनकीबात</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रम शृंखलेचा १३१ वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, तसंच न्यूज ऑन ए आय आर ॲप वरुन ऐकता येणार आहे.

आरोग्यमेळावा

बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव इथं येत्या २५ ते २८ फेब्रुवारी दरम्यान राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आलं आहे. आयुर्वेदिक उपचार पद्धतीचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना व्हावा या उद्देशाने हा मेळावा आयोजित करण्यात येत असल्याची माहिती केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते या मेळाव्याचे उद्घाटन होणार आहे. कार्यक्रमाला राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत.यावेळी आमदार संजय कुटे यांनी 'आजीबाईचा बटवा' ही संकल्पना घरोघरी पोहोचवून पारंपरिक भारतीय आयुर्वेदाचा ग्रामीण आणि शहरी भागात प्रचार-प्रसार करण्याचे आवाहन केलं.

**इंट्रो-फोकप्रवाह**

सांगली जिल्ह्यातील मिरज इथं अखिल भारतीय विद्यार्थी परिषद सांगली आणि राष्ट्रीय कला मंचच्या माध्यमातून "FOLK प्रवाह" या विभागस्तरीय युवा महोत्सव 2026 उद्घाटन सांस्कृतिक कार्य आणि माहिती प्रसारण मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आलं. यावेळी बोलताना ते म्हणाले..... . . . . . .

या युवा महोत्सवात वैयक्तिक 14 आणि सांघिक 8 कला प्रकारात स्पर्धा पार पडल्या. या महोत्सवात सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यातील साडेतीनशे हुन अधिक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग घेत आपली कला सादर केली.

**साखरएफआरपी**

यंदाच्या 2025-26 च्या हंगामात शेतकऱ्यांना उशिराने दिलेल्या उसाच्या रास्त आणि किफायतशीर किमतीवर म्हणजे एफआरपीवर 15 टक्के व्याज साखर कारखान्यांना द्यावेच लागेल, असा इशारा साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी दिला आहे. राज्यातील ज्या 45 साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना एफआरपीची 60 टक्क्यांपेक्षा कमी रक्कम दिलेल्या कारखान्यांची सुनावणी साखर आयुक्तालयात नुकतीच पार पडली त्यावेळी कोलते यांनी ही भूमिका मांडली.

आयुक्तालयाने थकीत एफआरपी प्रश्नी कारखान्यांची बाजू मांडण्यासाठीच्या नोटिसा बजावताच काही कारखान्यांनी रक्कम दिल्याचे स्पष्ट केले आहे.

**<u>प्रशंसापदक</u>**

संरक्षण मंत्रालयातील ऑपरेशन आणि वाहतूक विभागाचे कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत असताना गतवर्षी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाराष्ट्र सदनचे गुंतवणूक निवासी आयुक्त  सुशील गायकवाड यांना भारतीय लष्कर प्रमुखांचे प्रशंसा पदक देऊन गौरविण्यात आले. नवी दिल्लीत एका विशेष सोहळ्यात उपलष्कर प्रमुख लेफ्टनंट जनरल पुष्पेंद्र सिंह यांच्या हस्ते हे पदक प्रदान करण्यात आले. 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान गायकवाड यांच्या कर्तव्यनिष्ठ नियोजनामुळे मोहिमेला सहकार्य मिळाले होते.

**<u>इकौन्सिललॅब</u>**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संशोधनाचे व्यासपीठ मिळावे यासाठी राज्यातील १ हजार १ शे ३२ अनुदानित महाविद्यालयांत इनोव्हेशन कौन्सिल लॅब स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी केली आहे. ते काल पुण्यात  ‘इनोव्हेट यू टेकॅथॉनच्या’ तिसऱ्या टप्प्याच्या उद्घाटनावेळी बोलत होते. या स्पर्धेत ४५० संघांचे १७०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

**<u>जलवाहतूक</u>**

मुंबई ते विजयदुर्ग दरम्यान जलवाहतूक प्रवासी फेरी सेवा येत्या 1 मार्चपासून सुरू होणार आहे. राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी याबाबतची घोषणा केली आहे. वाहनांच्या वाहतुकीची सोय यामध्ये उपलब्ध आहे. या सेवेमुळे कोकणच्या पर्यटनालाही गती मिळणार आहे. या जहाजाची क्षमता 620 प्रवासी आणि 35 वाहने वाहून नेण्याची क्षमता असून हे अंतर 6 ते 7 तासांत पूर्ण करता येणार आहे.

**<u>माझीवसुंधरा-32सोलापूर,-21स्वप्ना-2प्रशांत</u>**

राज्य शासनाच्या ‘माझी वसुंधरा या अभियानाच्या चौथ्या टप्प्यात सोलापूर महानगरपालिकेने दोन कोटी रुपयांचा विशेष पुरस्कार पटकावला आहे. मुंबईतील सोहळ्यात राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या उपस्थितीत पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते महापौर विनायक कोंड्याल यांनी हा पुरस्कार स्वीकारला.तर या अभियानाच्या 5 व्या टप्प्यात नवी मुंबई महानगरपालिकेला अमृत गटात राज्यस्तरावर दुसरा क्रमांक मिळाला आहे.

**<u>भुसेराउत</u>**

शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी मालेगाव तालुक्यातील गिरणा साखर कारखान्याच्या भागधारकाकडून जमा केलेल्या १७८ कोटी रूपयांच्या अपहाराचा आरोप शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी केला होता. या आरोपांबाबत राऊत यांनी मालेगाव न्यायालयात दिलगिरी व्यक्त केल्यानंतर भुसे यांनी बदनामीचा खटला मागे घेतला आहे. राऊत यांनी शेतकरी आणि भागधारकांची बाजू ‘सामना’ वृत्तपत्रातून मांडण्याचेदेखील मान्य केले आहे.

**<u>कॉंग्रेसनिषेध</u>**

भारत मंडपम येथे आंतरराष्ट्रीय कृत्रिम बुद्धिमत्ता शिखर परिषदेत भारतीय युवक कॉँग्रेसने केलेल्या आंदोलनाच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्षाने काल कॉँग्रेस मुख्यालयाबाहेर निदर्शने केली. भाजपने; कॉँग्रेसच्या आंदोलनाची निंदा करत हे देशाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप केला.

**<u>उमेदमॉल</u>**

बचत गटांच्या बळकटीकरणासाठी अकोल्यात २० कोटी रुपयांच्या खुले प्रदर्शन निधीतून 'उमेद मॉल' उभारण्यात येणार असल्याचं पालकमंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितलं आहे. वऱ्हाडी जत्रा सरस  विभागीय प्रदर्शनाचा प्रारंभ फुंडकर यांच्या हस्ते काल करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. हे प्रदर्शन २४ फेब्रुवारीपर्यंत सुरु राहणार आहे.

**<u>पुणेरेल्वे</u>**

धुळ्याहून मुंबई आणि पुण्यासाठी रोज रात्री वातानुकुलीत सोबतच शयनकक्ष असलेली रेल्वेसेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणी धुळे शहराचे आमदार अनुप अग्रवाल यांनी केली आहे. या संदर्भात अग्रवाल यांनी भुसावळ येथील विभागीय व्यवस्थापकांना निवेदन दिलं आहे.

**<u>महिलाक्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये काल ऑस्ट्रेलियातील ॲडलेड इथं झालेल्या तिसऱ्या आणि अंतिम वीस षटकांच्या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा १७ धावांनी पराभव करत भारताने ही मालिका २-१ अशी जिंकली. भारताच्या १७७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाला १५९ धावा करता आल्या. श्रेयंका पाटील आणि श्री चरणीने प्रत्येकी तीन बळी घेतले.

**<u>क्रिकेट</u>**

पुरुषांच्या वीस षटकांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाचा सुपर एट गटात आज दक्षिण आफ्रिकेशी सामना होणार आहे.अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर हा सामना होणार आहे.

**<u>हवामान-</u>**

सांगली जिल्ह्यात काही भागात काल रात्री पाऊस झाला. आज राज्याच्या बहुतांश भागात हवामान कोरडे राहण्याची शक्यता असून मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**या बरोबरच आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं , नमस्कार.**